# महागुजरात सिड्स प्रा. लिमिटेड, नागपूर.

## उन्हाळी भुईमुंग पिक टी.ऐ.जी. २४, एस.बी.-११, संशोधित एम.जी.-२०, संशोधित एम.जी.जी.एन. ५१

### मशागत पद्धती व वाणाचे गुणधर्म

भारतात संपूर्ण तेलाच्या ५० टक्के भुईमुंग तेलाचा वाटा आहे. स्वच्छ व भरपूर प्रकाशामुळे उन्हाळी पिकाचे उत्पादन खरीप हंगामापेक्षा २ ते २.५ पट जास्त मिळते. उन्हाळ्यात रोग व किडीचा प्रादुर्भाव अत्यंत कमी असते. तसेच तेलाचे प्रमाणे २.५ ते ५ टक्के पर्यंत जास्त असते.

०१) **जमिन व हवामान :** उन्हाळी हंगामात मध्यम खोलीची चांगली निचरा होणारी मऊ भुसभूशीत सेंद्रीय पदार्थ भरपूर प्रमाण असणारी जमिन योग्य असते. अशा जमिनीत चांगली उगवण होऊन शेंगा चांगल्या लागतात.

०२) **पूर्व मशागत :** दोन तीन वर्षातून खोल नागरणी करावी वखराच्या २ ते ३ पाळ्या देवून जमीन चांगली तयार करावी. वखराच्या पाळीपूर्वी चांगले मुरलेल शेणखत किंवा कंपोस्ट खत द्यावे.

०३) **बीज प्रक्रिया :** बियाण्याला बाविस्टीने या बुरशीनाशकाची २० ग्रॅम प्रति दहा किलो प्रमाणे चांगले चोळून द्यावे.

०४) **बियाण्याचे प्रमाण :** कोरडवाहू पेरणीसाठी प्रति हेक्टरी ७५ किलो बियाने वापरावे. बागायती करीता १०० ते १२५ किलो प्रति हेक्टरी बियाणे वापरावे. पेरणी सरत्याने किंवा टोकून करावी. दोन ओळीतील अंतर ३० सेंमी व दोन रोपातील अंतर १० सेंमी ठेवावे.

०५) **पेरणीची वेळ :** उन्हाळी हंगामासाठी डिसेंबरच्या शेवटी किंवा जानेवारी महिन्याच्या १० ते १५ तारखे पर्यंत थंडीचे प्रमाण पाहून पेरणी लवकरात लवकर आटपावी, उन्हाळी भुईमुंग मे महिन्यात १० ते १५ तारखेपर्यंत काढणीस अत्यंत आवश्यक आहे.

०६) **रासायनिक खते :** पेरणीपूर्वी जमिनीत किमान हेक्टरी तीस गाड्या चांगले कुजलेले शेणखत मिसळावे. उन्हाळी पिकासाठी नत्र २५, स्फुरद ५० किलो या प्रमाणे मात्रा वापरावी. तसेच झिंकची कमतरता असल्यास ५० ग्रॅम झिंग सल्फेट आणि चुना १० लिटर पाण्यात मिळून द्रावणाची फवारीणी पिक ४० ते ४५ दिवसाचे असतांना करावी. आवश्यकतेनुसार बोरान द्यावे तसेच जीप्समचा वापर करावा.

०७) **तण नियंत्रण :** उन्हाळी भुईमुंग पिकांमध्ये आवश्यकतेनुसार तणाचे नियंत्रण करावे. पिक ४० ते ४५ दिवसाचे होई पर्यंत तण विरहित ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. निंदन केल्यास ३० ते ४० टक्के घट येते.

०८) **रोग व किड :** मावा, तुडतुडे आणि फुलकिडे करीता फॉस्फॅमिडॉन ८५ टक्के १२० मिली किंवा डायमेंथोएट ३० टक्के प्रवाही ५०० मिली., ५०० लिटर पाण्यात मिसळून १ हेक्टर क्षेत्रावर फवारणी करावी. पाने पोखरणारी किंवा गुंडाळणारी अळी हिरव्या रंगाची दिसून आल्यास त्याच्या नियंत्रणासाठी क्विनॉलफास २५ टक्के प्रवाही १०० मिली., ५०० लिटर पाण्यात मिसळून फवारा देणे

०९) **पाणी व्यवस्थापन :** पाण्याची पहिली पाळी पेरणीनंतर २१ दिवसांनी म्हणजे मुकूटमुळे फुटण्याच्या अवस्थेत द्यावी. त्यानंतर दर २० दिवसांनी जमिनीच्या आवश्यकतेनुसार पाण्याच्या पाळ्या देण्यात याव्या.

१०) **कापणी व मळणी :** पीक परिपक्व होताच झाडे उपटून शेतामध्ये उन्हात वाळवावी व त्यानंतर दाणे काढून पिक तयार करावे.

११) **वाणीची गुणवत्ता, गुणधर्म व हेक्टरी उत्पादन :**

**अ) टी.अे.जी. २४-** पिकाचा परिपक्वतेचा कालावधी ११० ते ११५ दिवस असून दाण्याचा उतारा ७२ ते ७४ टक्के असून १०० ग्रॅम दाण्याचे वजन ३५ ते ४५ ग्रॅम आहे तेलाचा उतारा ५० ते ५१ टक्के उत्पादन हेक्टरी ३० ते ३२ क्विंटल.

**ब) एस.बी.-११ -** पिकाचा परिपक्वतेचा कालावधी ११० ते १२० दिवस असून दाण्याचा उतारा ७२ ते ७४ टक्के असून १०० ग्रॅम दाण्याचे वजन २८ ते ४० ग्रॅम आहे तेलाचा उतारा ५० ते ५१ टक्के उत्पादन हेक्टरी १५ ते २० क्विंटल.

**क) संशोधित एम.जी.-२०-** पिकाचा परिपक्वतेचाप कालावधी ११० ते १२५ दिवस असून दाण्याचाप उतारा ७२ ते ७४ टक्के असून १०० ग्रॅम दाण्यांचे वजन ४० ते ४५ ग्रॅम आहे तेलाचा उतारा ५० ते ५१ टक्के उत्पादन हेक्टरी ३५ ते ४० क्विंटल. निमपसरी जात दाण्याचा रंग गडद गुलाबी दोन दाण्याची शेंग गुरांसाठी उत्तम चारा, २५ ते ३० दिवसांत फुलोऱ्यावर येते.

**ड) संशोधित एम.जी.जी.एन. ५१-** पिकाचा परिपक्वतेचा कालावधी १०१ ते ११० दिवस, दाण्याचा उतारा ७२ ते ७८ टक्के, १०० ग्रॅम, दाण्यांचे वजन ४५ ते ४९ ग्रॅम, निमपसारी जात वाळलेल्या शेगाचे वजन ३८ ते ४० क्विंटल हेक्टरी, २ दाणी शेंगा व दाण्याचा गुलाबी रंग सदवान रोग व किडीस बळी न पडणारी असुन अत्यंत उत्पादन क्षम आहे.

Scanned with OKEN Scanner